*B.S.P's*
*Gomantak Ayurveda Mahavidyalaya & Research Centre*
*Vajem, Shiroda - Goa*

## भारतीय संस्कृति प्रबोधिनीचे गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय व कामाक्षी आरोग्यधाम मध्ये कोविड पश्चात चिकित्सा उपलब्ध

गोव्यातील एकमेव असलेले व गेली २५ वर्षे गोमंतकीयांच्या सेवेस तत्पर असलेले भारतीय संस्कृति प्रबोधिनीचे कामाक्षी आरोग्यधाम या महामारीच्या काळात सुध्दा रूग्णसेवेसाठी तत्पर आहे. कामाक्षी आरोग्य धाम हे १00 खाटांचे सुसज्ज इस्पितळ शिरोडा येथे कार्यरत आहे जीथे शुध्द व शास्त्रोक्त पध्दतीने आयुर्वेद सिध्दांतांचे पालन करून शास्त्रशुध्द पध्दतीने आयुर्वेद चिकित्सा केली जाते. कामाक्षी आरोग्यधाम मध्ये कायचिकित्सा, स्त्रीरोग, बालरोग, शालाक्य म्हणजे नाक, कान, घसा, पंचकर्म इत्यादि विभाग कार्यरत आहे.

आजच्या या महामारीच्या काळात कोविड पासून संरक्षणासाठी व व्याधीक्षमत्व वाढविण्यासाठी "अनंतचूर्ण" हे औषध तयार करून ते रूग्णांसाठी व सर्वसामान्य जनतेसाठी उपलब्द केलेले आहेत. त्याबरोबरच कोविड होऊन गेलेल्या व्यक्तींसाठी ज्यांच्यामधे थकवा किंवा दुर्बलता अशक्तपणा, कणकण, अंगदुखी इत्यादी लक्षणे उरलेली असतात किंवा ज्यांना कोविड होऊन गेलेला आहे अशा व्यक्तिंच्या स्वास्थ्य रक्षणार्थ व त्यांचे शक्ति, व्याधीक्षमत्व पुनरूज्जिवीत करण्यासाठी आयुर्वेद अत्यंत लाभदायी आहे. कामाक्षी आरोग्यधाम येथे अशा कोविड पश्चात (म्हणजे कोविड होऊन गेलेल्या रूग्णांसाठी) अत्यंत लाभदायक चिकित्सा उपलब्द आहेत. त्यामध्ये विविध अभ्यंतर औषधे , रसायन चिकित्सा, योग, प्राणायम उपलब्द आहेत. त्याबरोबरच रूग्णांचे बल, व्याधीचे बल, ऋतु रूग्णांची प्रकृती इत्यादी गोष्टींचा सारासार विचार करून रूग्णांसाठी विविध पंचकर्म जसे बस्ति (आजुत) विरेचन इत्यादी व त्याचबरोबर पंचकर्माशिवाय स्नेहन म्हणजे तेलाचा मसाज, स्वेदन (शरिराला औषधी वाफेचा शेक) शिरोधारा (डोक्यावर औषधी तेलांच्या धारा धरणे) इत्यादी विविध उपचार केले जातील. ज्याचा अत्याधिक फायदा रूग्णांना स्वास्थ्य मिळविण्यासाठी व अरोग्य रक्षणासाठी होईल म्हणून जास्तीत जास्त रूग्णांनी कामाक्षी आरोग्यधामला भेट देऊन चिकित्सांचा फायदा करून घ्यावा.

संपर्क सकाळी ९ ते ४.३० पर्यंत

दूरध्वनी क्र ०८३२ २९५७३०५